ARTHA
Poona 4.

Reg. No. B. 3434. Licence No. 53.
Licenced to post without prepayment.

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र.

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

वर्ष १७ पुणें, बुधवार तारीख ३ जानेवारी, १९५१ अंक १

॥ श्री ॥

## दि बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लिमिटेड, पुणें २.

सरकारी नियंत्रित भावानें नवीन हंगामाची

★ चार लक्ष रुपये किंमतीची साखर तयार झाली ★

★ साखर विक्रीची रोख रक्कम येण्यास वेळ लागेल ★
याकरितां

★ आणखी कांहीं महिने ठेवी स्वीकारण्यांत येतील ★

१६ जुलई १९५० पासून नवीन मशिनरीच्या उभारणीकरितां
अेक वर्ष मुदतीच्या ठेवी घेण्यास सुरुवात केली.

१६ जुलई १९५१ पासून मुदतीप्रमाणें कंपनी
**ठेवी परत करण्यास सुरुवात करील.**

★ ठेवींची मुदत १ वर्ष : व्याज ६ टक्के ★

मुदतीच्या ठेवीचे फॉर्म सिंडिकेटच्या पुणें येथील मुख्य कचेरींत मिळतील.

दि. २५ डिसेंबर १९५०.
कॉमनवेल्थ बिल्डिंग, ९८०
सदाशिव पेठ, लक्ष्मीरोड, पुणें २.

चंद्रशेखर गोविंद आगाशे,
बी. ए., एल्‌एल्. बी.,
सी. जी. आगाशे अॅण्ड को.,
मॅनेजिंग एजंट्स.

दळणाच्या चक्क्या-टूल-ग्राइंडर्स
मशीन टूल्स
कडबा कापण्याचीं यंत्रें—क्रुवत मशीन्स.
या मालाबद्दल आमचेकडे चौकशी करण्यास विसरूं नका.
केळकर बंधू, लक्ष्मी रोड, पुणें शहर.

# विविध माहिती

हिन्दी तज्ज्ञांचा सन्मान—अमेरिकन वुड प्रिझर्व्हर्स असोसिएशन ह्या संस्थेनें लाकूड टिकविण्याचें रसायन शोधून काढणाऱ्या हिंदी शास्त्रज्ञाचा गौरव केला आहे. डॉ. एस. कामेसम ह्या शास्त्रज्ञानें काढलेल्या रसायनाचाच उपयोग आपण करणार असल्याचें संस्थेनें कळविलें आहे. हें रसायन अमेरिकेंत 'ग्रीन सॉल्ट' ह्या नांवानें माहित आहे. आशियांत तयार झालेलें अशा प्रकारचें हें पहिलेंच रसायन आहे.

पाकिस्तानची साखरेची आयात—पाकिस्तान सरकारनें क्युबा व इंग्लंडकडून २०,००० टन साखर आयात करण्याचें ठरविलें आहे असें समजतें. क्यूबाकडून १०,००० टन साखर घेऊन एक बोट जानेवारी १९५१ मध्यें पाकिस्तानला जाईल. पाकिस्तानांत सध्या साखरेची फार टंचाई असल्यानें ही आयात करण्यांत येत आहे.

पत्रें निवडण्याचा उच्चांक—बेल्जमच्या पोस्टखात्यांतील जीन बोएल हा पत्र निवडण्याच्या कामांत पहिला ठरला आहे. त्यानें १३ मिनिटें व १० सेकंदांत १,००० पत्रें निवडलीं. हा वेग एका मिनिटाला ८० पत्रें असा पडतो.

संयुक्त प्रांतांतील वीज पुरवठा—संयुक्त प्रांत सरकारनें खेड्यांतील जीवनाची पुनर्घटना करण्यासाठी १५ वर्षांचा वीजपुरवठ्याचा कार्यक्रम आंखला आहे. ह्या योजनेचे ५ स्थानिक विभाग करण्यांत आले आहेत. त्यापैकी गंगेवरील धरणापासूनच ८५,७०० किलोवॅट वीज तयार होईल. खेड्यांतून उद्योगधंद्यांना लागणारी वीजही पुरविण्याची सोय करण्यांत येईल.

तंबाखूचा अमेरिकन तज्ज्ञ—भारताचें तंबाखूचें उत्पादन आणि बाजारपेठ ह्यांचा अभ्यास करण्यासाठी अमेरिकेच्या तंबाखूच्या धंद्यांतील एक तज्ज्ञ मि. डीन हे भारतांत येणार आहेत. भारताप्रमाणेंच पाकिस्तान, इंडोनेशिया, हॉंगकॉंग, फिलिपाईन्स इत्यादि देशांतील तंबाखूच्या उत्पादनाचीही ते पहाणी करणार आहेत.

बार्शीत टेलिफोन—बार्शी ते कुर्डुवाडी ह्यांचे दरम्यान टेलिफोनची लाईन घालण्याचें काम जानेवारी १९५१ मध्यें सुरू होणार असल्याचें समजतें. प्रथम बार्शीच्या पोस्टांतून टेलिफोन करण्याची व्यवस्था होणार आहे. बार्शी शहरांत ५० पेक्षा जास्त टेलिफोन वर्गणीदार झाल्यास वर्गणीदारांना टेलिफोन देण्यांत येईल. बार्शीतील व्यापारीवर्गानें टेलिफोनसंबंधीं पुढाकार घेतला होता.

हत्तिणीची मिरवणूक—भारत सरकारनें तुर्कस्तानला 'मेहिनी' ह्या नांवाची एक हत्तीण भेटीदाखल दिली आहे. ही भेट तुर्कस्तानला पोचल्यावर तिची मोठ्या समारंभपूर्वक मिरवणूक काढण्यांत आली. हत्तीण पहाण्यास मुलांची फार गर्दी जमली होती.

भारताचें चहाचें उत्पादन—१९५० सालीं भारतांतील चहाचें उत्पादन जगांतील एकूण उत्पादनाच्या निम्में होईल असा अंदाज करण्यांत आला आहे. जगांतील चहाचें एकूण उत्पादन १,१८,६०,००,००० पौंड होईल. त्यापैकीं ५९,५०,००,००० पौंड चहा भारतांत होईल. भारताच्या खालोखाल सीलोनचा अनुक्रम लागतो. त्यानंतर पाकिस्तानचा अनुक्रम लागतो. ह्या वर्षी चीनमधून मात्र चहा कमी प्रमाणांत निर्यात होईल.

उसाच्या किंमतींत बदल—चालू हंगामासाठी भारत सरकारनें उसाच्या ज्या किंमती निरनिराळ्या विभागांकरितां ठरविल्या आहेत त्यांत बदल करण्यांत येणार नाहीं असें समजतें. सध्याचा हंगाम चालू असेपर्यंत ह्याच किंमती अंमलांत रहाणार आहेत.

आयर्लंडमधील बँकांत संप—आयर्लंडमधील बँकांत ५,००० नोकरांनीं संप पुकारला असल्यामुळें त्या २७ डिसेंबर, १९५० पासून चार दिवस बंद होत्या. नोकरांनीं पगारांत वाढ करण्याची आणि पेन्शन देण्याची मागणी केली होती. ह्या मागण्या मान्य करणें आपणांस परवडणार नसल्यानें, सरकारनेंच हुकूम काढून बँका बंद ठेवाव्या अशी विनंति बँकांतर्फे करण्यांत आली होती.

अमेरिकेंतील महागाई—ऑक्टोबर १९५० ते नोव्हेंबर, १९५० ह्या एका महिन्यांत अमेरिकेंतील राहणीच्या खर्चाचा उच्चांक आणखी वाढला. तो ह्याहीपेक्षां अधिक वाढेल असा अंदाज आहे. १९३५ ते १९३९ दरम्यानच्या काळांत जो सरासरी निर्देशांक होता त्याच्या तुलनेनें वरील काळांत तो १७५.६ टक्के वाढला. कोरिआंतील युद्ध सुरू झाल्यापासून महागाई ३.२ टक्यांनीं वाढली.

रशियाचें तेलाचें उत्पादन—१९५० सालीं रशियानें जितकें तेल उत्पादन करण्याचें ठरविलें होतें, त्याच्यापेक्षां २२,००,००० टन अधिक तेल डिसेंबर १९५० अखेर निर्माण करण्यांत येईल असा अंदाज आहे. कोळशाचें उत्पादनही ठरलेल्या उत्पादनापेक्षां १४ कोटी टनांनीं अधिक होणार आहे.

चीनची पाकिस्तानी कपाशीची खरेदी—कम्युनिस्ट चीन पाकिस्तानांतून शक्य तेवढी कपास घेईल त्या दरानें खरीदण्याची कोशीस करीत आहे. चीननें १९४७-४८ मध्यें फक्त ४६ व १९४८-४९ मध्यें ४३ गांठी पाकिस्तानाकडून घेतल्या होत्या. १९४९-५० मधील खरेदी ४७ गांठींची होती. पण चालू वर्षी आतांपर्यंतच चीननें २७,००० गांठी पाकिस्तानकडून विकत घेतल्या आहेत. 'पाक पायोनियर' ह्या बोटींतून २०,००० गांठी चीनकडे रवानाही झाल्या आहेत.

आळशी लोकांची गोष्टी ऐकण्याची सोय—लोक सामान्यत: आळशीच असतात. ह्या आळसाला उत्तेजन देणारे जिन्नस खपविणें किफायतशीर असतें. ह्या दृष्टीनें, गोष्टी सांगणाऱ्या ग्रामोफोनच्या तबकड्या तयार करण्यांत येत आहेत. तबकडीची प्रत्येक बाजू शांतपणें एक तासभर गोष्ट सांगेल, ती डोळे मिटून आरामशीर ऐकतां येईल.

—सर्व प्रांतांतील—
सुती-गरम-रेशमी
—खादीचें माहेरघर—
खादी मन्दिर
२६१, बुधवार पेठ
हमदेरे बोळाजवळ,
पुणें २.

# अर्थ

बुधवार, ता. ३ जानेवारी, १९५१





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे

संपादक :
श्रीपाद वामन काळे


## शास्त्राभिमुख झालेला महाराष्ट्र

दुसऱ्या जागतिक महायुद्धानंतर एकामागून एक पौर्वात्य राष्ट्रांमध्यें जागृति होत आहे. भारतांत स्वातंत्र्याचें वारें वाहूं लागून येथाल राजकीय, सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक इत्यादि निरनिराळया क्षेत्रांत प्रत्यहि नवचैतन्य निर्माण होत असलेलें आढळून येत आहे. प्रथम अन्न, वस्त्र आणि निवारा या जीवनावश्यक मूलभूत गरजा भागविण्यासाठीं व नंतर रहाणीचें मान वाढविणें, अनेक अंतर्गत गोष्टींची पुनर्घटना करणें, आर्थिक व राजकीय दृष्ट्या देशाचें आंतरराष्ट्रीय स्थान उच्च राखणें, इत्यादिसाठीं विविध प्रकारांनीं प्रयत्न केले जात आहेत. आधुनिक काळाला अनुरूप अशी शास्त्रांची गरज त्यामुळें आज भारताला अत्यंत निकडीनें भासत आहे. देशांतील एकंदर शास्त्रीय प्रगतीसाठीं अनेक मोठमोठ्या योजना अमलांत आणल्या जात आहेत व मध्यवर्ती आणि प्रांतिक सरकारें त्यांसाठा शक्यतो पैसाहि देत आहेत. त्याचप्रमाणें शास्त्रांचें शिक्षण, संशोधन आणि प्रसार याकडे एकंदर जनतेचेंहि लक्ष विशेष लागलें आहे ही फार उत्साहवर्धक गोष्ट होय. शास्त्रांत आजवर मागासलेल्या महाराष्ट्रांतहि हें वारें वाहूं लागून शास्त्रीय गोष्टींना नवीन चालना मिळूं लागली आहे असें दिसून येतें. याचें एक अगदीं ताजें व ठळक उदाहरण म्हणजे "सह्याद्रि"चा जानेवारी १९५१ चा "शास्त्रीय महाराष्ट्र विशेषांक" हें होय. महाराष्ट्रांतील एका प्रमुख व भारदस्त मासिकानें संपूर्णतः शास्त्राला वाहिलेला त्या मासिकाचा हा खास अंक होय. अंक योजनापूर्वक, मोठा व "सह्याद्री"च्या उज्वल नांवाला शोभेल असाच असून त्या संस्थेनें केलेली ती एक भरीव शास्त्रसेवाच होय असें इतिहासांत नमूद केलें जाईल याची आम्हांला खात्री वाटते. या कार्याबद्दल मासिकाच्या संपादकांचें व विशेषांकाच्या संपादक मंडळाचें आम्हीं मनःपूर्वक अभिनंदन करतो.

अंकाच्या योजनेसंबंधीं सुरुवातीलाच संपादकीयांत म्हटलें आहे कीं, "घटको-घटकी लागणाऱ्या नवीन शोधांनीं, आपली इच्छा असो वा नसो, आपल्या जीवनांत क्रांति घडत असतां, तिचा वेग सुसह्य आणि ते शोध उपयुक्त किंवा सुखकारक होण्यासाठीं महाराष्ट्र काय करीत आहे, ह्याचें समालोचन करावें अशी ही योजना आहे." व त्याचसाठीं या विशेषांकाच्या संपादकमंडळाच्या निवेदनांत दिलें आहे, कीं "ही योजना आखणारांनीं अगदी प्रथमपासूनच महाराष्ट्र व शास्त्र यांच्या संबंधावरच प्रामुख्यानें आपलें लक्ष केंद्रित केलें होतें व त्याला अनुरूप असेंच लिखाण या अंकांत एकत्र आणण्याचा प्रयत्न केला गेला आहे." त्याप्रमाणें या अंकांतील निरनिराळया लेखांत महाराष्ट्रानें आजवर केलेल्या एकंदर शास्त्रसेवेचा आढावा पूर्वग्रहरहित व चांगला घेतलेला असून यापुढें महाराष्ट्रानें आपली प्रगति कशी करावी यासंबंधींचे विविध विचार व सुचविलेले उपाय खरोखरी विचाराहच नव्हेत तर कित्येक व्यवहार्यहि पण आहेत ही मोठी आशादायक गोष्ट होय. संपादकमंडळाचें निवेदन कळकळीचें, सुस्पष्ट व मननीय आहे; पण विशेषतः त्यांत आणि डॉ. कृ. ख. डोळे, प्रा. श्री. ल. आजरेकर. प्रि. गो. रा. परांजपे, श्री. ज. ब. कुमठेकर, इत्यादींच्या लेखांत निरनिराळया विषयांच्या अनुषंगानें ठिकठिकाणीं आलेलें महाराष्ट्रांतील शास्त्रीयविषयक सद्यःपरिस्थितीचें विश्लेषण खात्रीनेंच मार्गदर्शक होईल असें वाटतें. कुटुंबांतील निरनिराळया व्यक्तींची, संघराज्यांतील घटक राज्यांची किंवा एकंदर जगांतील निरनिराळया राष्ट्रांची फुटीर वृत्ति ही ज्याप्रमाणें अंतिम, त्यांच्या त्यांच्या हानीला कारणीभूत झाल्याशिवाय रहात नाहीं; त्याचप्रमाणें आधुनिक काळांतील निरनिराळया उद्योगधंद्यांनीं व व्यवसायांनीं एकमेकांशीं चांगले हितसंबंध राखणें दिवसेंदिवस आवश्यक होत चाललें आहे. म्हणूनच देशांतील शास्त्रीय शिक्षण, संशोधन, वाङ्मय, इत्यादींकडे इतर व्यवसायांतील पुढारी व्यक्तींनीं तरी अवश्य लक्ष दिलें पाहिजे व आजच्या आपल्या देशाच्या शास्त्रांत मागासलेल्या अशा परिस्थितींत त्यांना चांगलेंच द्रव्यसहाय्य व प्रोत्साहन दिलें पाहिजे. संपादक मंडळाच्या निवेदनांतील "अन्नछत्रांतील भूकबळी" ह्या स्फुटांत महाराष्ट्राची पैशाच्या अभावीं होणारी कुचंबणा या दृष्टीनें पाहून अगोदर टाळली पाहिजे असें कोणीहि सुज्ञ मनुष्य म्हणेल. महाराष्ट्रांतील दानशूर व श्रीमान व्यक्तींचें लक्ष याकडे जितकें लवकर वळेल तितकी लवकर महाराष्ट्राची व एकंदर भारताचीहि प्रगति झपाट्यानें होईल.

योजनाबद्ध मांडणी व विचारांची उच्च पातळी हें या विशेषांकाचें वैशिष्ट्य होय. त्या कारणानें मराठींतील शास्त्रीय वाङ्मयाच्या विभागांतील कांहीं भाग व अखेरचा संकीर्ण लेखांचा व पत्रव्यवहाराचा सर्वच्या सर्वच विभाग स्थलमर्यादेस्तव गाळावा लागला ही मोठी खेदाची गोष्ट होय. तसें पाहिलें तर सह्याद्रि संस्थेला ते सर्व याच अंकांत अंक थोडा-फार अधिक वाढवूनहि देणें फारसें कठीण नव्हतें; व एकाच आवरणांत या निमित्तानें लिहिलेले सर्व विचार देणें अधिक श्रेयस्कर ठरलें असतें असें आम्हांस वाटतें.

पुण्यांतील आणखी एक महत्त्वपूर्ण व शास्त्रीय प्रगतिनिदर्शक घटना म्हणजे दि. २३ डिसेंबर पासून २७ पर्यंत फर्ग्युसन महाविद्यालयांत भरविण्यांत आलेलें "छापण्याच्या शाईचें प्रदर्शन" हीं होय. अशा तऱ्हेचें प्रदर्शन भारतांत हें पहिलेंच होय व तें सर्व महाराष्ट्रीय शास्त्रज्ञांच्या कल्पकतेचें व संशोधन कार्याचेंच फळ होय ही मोठी अभिमानास्पद गोष्ट आहे. प्रदर्शनाचें उद्घाटन येथील नॅशनल केमिकल लॅबॉरेटरीचे डायरेक्टर प्रो. जेम्स मॅक्बेन यांनीं केलें व त्यांनीं आपल्या भाषणांत त्यासंबंधीं प्रांजळपणें प्रशंसोद्गार काढले. प्रदर्शनांत अनेक विभाग होते, तथापि त्यांतील दोन गोष्टींसंबंधीं विशेष उल्लेख करावासा वाटतो. पहिला डॉ. डोळे यांनीं एरंडेलाच्या "डीहायड्रेशन्" संबंधीं लाविलेला शोध. त्यामुळें आपल्याच देशांत मुबलक तयार होणाऱ्या या तेलाचा उपयोग छापण्याची शाई तयार करण्यासाठीं होणार आहे;

ही बाब खरोखरीच फार महत्त्वाची होय. दुसरा म्हणजे ही शाई तयार करण्यासाठी व तिचें शास्त्रीय दृष्टीनें परीक्षण करण्यासाठी लागणारीं निरनिराळीं आठ यंत्रें पुण्यांतील कारागिरांनींच बनविलेलीं होतीं; तींहि तेथें मांडलीं होतीं. हें प्रदर्शन पाहण्यासाठी म्हणून मुद्दाम मुंबईहूनहि अनेक तज्ज्ञ लोक येथें आले होते. सर्व तज्ज्ञांनीं या गोष्टींचें अभिनंदन व कौतुक केलें. एकंदरींत, शास्त्रीय संशोधनाचें व शास्त्रीय ज्ञानाचें सहाय्य या नित्योपयोगी पदार्थाच्या निर्मितीला किती प्रकारें होत आहे हें या प्रदर्शनावरून लोकांच्या मनांवर पूर्णपणें बिंबलें आहे. अशा तऱ्हेनें परदेशांतील धंद्यांशीं टक्कर देण्यासाठी आपल्या शास्त्रज्ञांनीं झटलें पाहिजे व त्यांना अशा प्रकारचें शास्त्रीय संशोधन करण्यासाठी आमच्या उद्योगपतींनीं व श्रीमंत दानशूरांनीं सढळ हातांनीं द्रव्यसहाय्य देऊन त्यांची सर्व सोय करून दिली पाहिजे, हें उघड होय.

## सहकारी कायद्याखालील डिव्हिडंडचा दर

### बोनस हा डिव्हिडंडचाच प्रकार आहे

( ले:– श्री. पी. एच. बनातवाला )

मुंबई सहकारी कायद्याच्या ३८ व्या कलमाप्रमाणें, कोणत्याहि सोसायटीस ६¼% पेक्षां जास्त डिव्हिडंड देतां येत नाहीं. ह्या कलमाखालीं देता येणाऱ्या डिव्हिडंडपेक्षा ज्यास्त बोनस देण्यास २३ व्या नियमानें मनाई केली आहे. सहकारी सोसायटीला ६¼% पर्यंत डिव्हिडंड देतां येऊन पुन: आणखी तितकाच बोनस देतां येतो, असा अर्थ कांहीं ठिकाणीं लावण्याचा प्रयत्न चालू आहे; परंतु तो अर्थ चुकीचाच केवळ नव्हे, तर कल्पनेच्याहि पलीकडचा आहे. ३८ वें कलम व २३ वा नियम हीं एकत्रच वाचलीं पाहिजेत. त्याचा अर्थ, सोसायटीनें ६¼% डिव्हिडंड वांटलें तर तिला बोनस देतां येणारच नाहीं, असा सरळ आहे. ३८ व्या कलमांतील मर्यादा ओलांडतां येणार नाहीं. ३८ व्या कलमांतील तत्त्व लक्षांत घेऊनच २३ वा नियम करण्यांत आलेला आहे हें उघड आहे.

मुंबई प्रांतिक सहकारी इन्स्टिटयूटच्या शिक्षण फंडाची वाढ करण्यासाठी ३९–A हें नवें कलम १९४८ च्या ३८ व्या कायद्यानें घालण्यांत आलें. आपल्या सभासदांना ४% किंवा जास्त दरानें डिव्हिडंड वाटणाऱ्या सोसायटीनें इन्स्टिटयूटच्या शिक्षण फंडास ठराविक दरानें हातभार लावलाच पाहिजे, असें बंधन त्या नव्या कलमानें घातलें आहे. २६–A ह्या नियमानें, हे दर निश्चित केले आहेत. सोसायटीनें ३८ व्या कलमाखालीं ३¼% डिव्हिडंड वांटलें व शिलकी नफ्यांतून २¾% बोनस दिला, तर एकूण नफावांटणी ६¼% होईल. परंतु २६–A प्रमाणें इन्स्टिटयूटला वर्गणी देण्याचें कारण नाहीं, असा युक्तिवाद लढविण्यांत येऊं लागला आहे. कायद्याच्या तत्त्वास हरताळ फासण्याचा असा प्रयत्न सहकारी संघटनेंत तरी अप्रस्तुत आहे, आणि कायद्यासहि तो धरून नाहीं. बोनस म्हणजे जादा डिव्हिडंडच असल्यानें, त्याचें डिव्हिडंडचें स्वरूप केवळ नांव बदलण्यानें पालटणार नाहीं, आणि म्हणून कायद्यांतील तरतुदी त्यावर बंधनकारक होतील. (बॉ. को. का. ऑ. १९५०)

'युगोस्लाव्हियाला मदत'— युगोस्लाव्हियांत दुष्काळ पडण्याची भीति उत्पन्न झाल्यानें अमेरिकन सरकारनें ३ कोट, ८० लाख डॉलर्सची मदत या देशाला देण्याचें ठरविलें होतें. ह्या मदतीला अमेरिकेच्या प्रतिनिधिगृहानें आतां मान्यता दिली आहे.

## अलिगड येथील आर्थिक परिषद

हिंदी आर्थिक परिषदेचें ३३ वें अधिवेशन अलिगड विद्यापीठातर्फे डिसेंबर अखेर म्हैसूर युनिव्हर्सिटीचे प्रो. डीसूझा यांचे अध्यक्षतेखाली भरलें होतें. आर्थिक परिषदेचें उद्घाटन करतांना हिंद सरकारचे व्यापारमंत्री, श्री. श्रीप्रकाश यांनीं परराष्ट्रीय व्यापारांत समतोलपणा साध्य करण्यासाठी अर्थशास्त्रज्ञांनीं सरकारला मार्गदर्शन करावें, असें सुचविलें. अर्थशास्त्रज्ञांचें अनुकूल मत असेल तर परराष्ट्रीय व्यापारावरील नियंत्रणें उठविण्यास हरकत नाहीं, असें ते म्हणाले. हिंदच्या गृहोद्योगांच्या मालाला परदेशांच्या बाजारपेठांत मागणी आहे हें लक्षांत घेतां ग्रामोद्योगांचें उत्पादन कसें वाढवावें या बाबतींत अर्थशास्त्रज्ञांच्या सल्ल्याची त्यांची अपेक्षा आहे. त्याचप्रमाणें, सध्यां भासत असणाऱ्या भांडवल–तुटवड्याच्या प्रश्नाच्या बाबतींतहि अर्थशास्त्रज्ञ मार्गदर्शन करूं शकतील असें व्यापारमंत्री म्हणाले. आपल्या अध्यक्षीय भाषणांत प्रो. डीसूझा यांनीं, 'अनिर्बंध नफ्याची इच्छा व तदनुसार अर्थव्यवहार' विरुद्ध 'उद्योगधंद्यांवर सरकारची पूर्ण सत्ता' या दोन मतप्रवाहांची चर्चा करून प्रत्येकांत घेण्यासारखें कांहीं तरी आहे, असें मत व्यक्त केलें, व साधारणपणें आजच्या काळांत सर्वांचें कल्याण साधणाऱ्या अर्थव्यवहाराची शिफारस केली. हिंदच्या दृष्टीनें अशा प्रकारच्या अर्थव्यवहारावर भर देणें योग्य दिसतें. देशापुढील आर्थिक समस्या सोडवितांना वाढत जाणाऱ्या लोकसंख्येच्या प्रश्नाकडे लक्ष पुरविणें किती आवश्यक आहे, याचें विवेचन डॉ. ग्यानचंद व श्री. चंद्रशेखर यांनीं केलें.

परिषदेंत रिझर्व्ह बँकेचे डॉ. शर्मा यांनीं हिंदी संघराज्यांत समाविष्ट होणारीं राज्यें, संस्थानी संघराज्यें व मध्य सरकारकडून राज्यव्यवस्था चालविले जाणारे प्रदेश यांच्या जमाखर्चाच्या बाबतींत १९५०–५१ या सालच्या परिस्थितीची उद्बोधक माहिती देणारा प्रबंध वाचला. हिंदी संघराज्यांतील या सर्व प्रदेशांची १९५०–५१ ची जमा रु. ७११॥ कोटी, ५० लक्ष असून खर्च रु. ७१३ कोटी असल्यामुळें एकंदर तूट रु. १॥ कोटी आहे. निर्वासितांचा प्रश्न व विलीन झालेल्या संस्थानांचा भाग यामुळें खर्चाचा बोजा वाढला आहे. सरकारी उत्पन्नापैकी एकंदर ८० टक्के उत्पन्न निरनिराळ्या करांपासून होतें, व यापैकी ३० टक्के उत्पन्न प्राप्तीवरील कराच्या उत्पन्नामुळें येतें. देशांत स्थैर्य राखण्याच्या कामासाठी एकंदर खर्चापैकी ४४ टक्के खर्च केला जातो. मध्य सरकारच्या उत्पन्न व खर्चाच्या आकड्यापेक्षा निरनिराळीं राज्यसरकारें व संस्थानी गट यांचें उत्पन्न व खर्च याचे आकडे जास्त आहेत हें हिंदी संघराज्याचें एक वैशिष्ट्य आहे.

परिषदेंतील चर्चेंत, कोणत्याहि प्रकारची नियंत्रणें रद्द करण्याचा काळ अद्याप फार दूर आहे, असें मत प्रो. वकील यांनीं व्यक्त केलें. हिंदसारख्या अपुऱ्या उत्पादनाच्या देशांत बिझिनेस प्रॉफिट टॅक्स व कॅपिटल गेन्स टॅक्स अगदीं अयोग्य आहेत व या बाबतींत नंतर देण्यांत आलेल्या सवलतीहि अपुऱ्या आहेत असें एक मत व्यक्त केलें गेलें. उत्पादनाला चालना देण्यासाठीं घसारा फंडाच्या बाबतींत जास्त सवलती दिल्या जाव्या असेंहि मत व्यक्त झालें. भांडवल मिळूं शकत नाहीं, तर भांडवल उभारण्याची सर्व जबाबदारी निरनिराळ्या उपायांनीं सरकारनेंच उचलावी असेंहि सुचविण्यांत आलें.

## आगकाड्यांचा धंदा

या धंद्याची वार्षिक उत्पादनशक्ति ६० काड्यांची एक पेटी याप्रमाणें प्रत्येकी ५० ग्रोसांचा एक असे ७ लाख खोके तयार करण्याइतकी आहे. देशांत अनेक ठिकाणीं हा धंदा घरगुती स्वरूपाचा असल्यामुळें त्याची ठराविक उत्पादनशक्ति अजमावणें कठीण झालें आहे. वेस्टर्न इंडिया मॅच कंपनी लि. च्या एकूण पांच कारखान्यांतून धंद्यांतील दोन तृतीयांश उत्पादन होत असतें. तसेंच, ही कंपनी आगकाड्या तयार करतांना लागणारें पोटॅशियम क्लोरेट व गोंद या वस्तूंचेंहि उत्पादन करीत असून पोटॅशियम क्लोरेटच्या आणि गोंदाचा कांहीं भाग आगकाड्यांच्या इतर कारखानदारांसाहि पुरविण्यांत येतो. या धंद्यांत १९४८ मध्यें ५,३३,२४३ इतके खोके कमाल उत्पादन झालें. १९४९ मधील उत्पादन ५,९५,००७ खोके होतें. देशांत आगकाड्यांचा वापर प्रतिवर्षी सुमारें ५ लाख खोके होत असावा आणि पुढील पांच वर्षांत आणखी ५ टक्क्यांनीं तो वाढण्याची अपेक्षा आहे. आगकाड्या बनविण्यास लागणारें लाकूड आणि विशेषतः फॉस्फरस व गंधक यांसारख्या रसायनांच्या पुरवठ्याची बिकट परिस्थिती असून कच्च्या मालाच्या महाग किंमती व मजुरी यांमुळें आगकाड्यांचा उत्पादनखर्च वाढला आहे. आगकाड्यांच्या विक्रीची किंमत सरकारनें ठरवून दिली असल्यामुळें त्यांचा प्रत्यक्ष उत्पादन खर्च व विक्रीची किंमत यांतील अंतर बरेंच कमी झालें आहे. ह्या धंद्याच्या हितसंबंधाच्या रक्षणासाठीं सुसूत्र धोरण असणें अत्यावश्यक आहे. या धंद्यास लागणाऱ्या लाकडाचा नियमित व दीर्घकाल पुरवठा होण्याचे दृष्टीनें जंगलांची वाढ होणें अगत्याचें आहे. हिमालयावरील देवदार वृक्षाच्या जंगलांचा आगकाड्यांच्या लाकडासाठीं अतिशय उपयोग होण्याची शक्यता आहे. दक्षिण कॅनरांतील जंगलें व मुंबई, मद्रास राज्यांतील कांहीं भाग ह्यांतून आगकाड्यांस लागणारें लाकूड मोठ्या प्रमाणावर मिळूं शकेल.

## 'वेल्थ ऑफ इंडिया' च्या दुसऱ्या खंडाचें प्रकाशन

भारत सरकारच्या शास्त्रीय व औद्योगिक संशोधन मंडळानें भारतांतील कच्च्या व औद्योगिक मालाची माहिती देणाऱ्या 'भारताची संपत्ति' (वेल्थ ऑफ इंडिया) या कोशाचा ४८० पृष्ठांचा सचित्र दुसरा खंड नुकताच प्रसिद्ध केला आहे. या खंडांत भारतांत उपलब्ध होऊं शकणाऱ्या कच्च्या मालाची बरीच माहिती दिलेली आहे. या माहितीपूर्ण ग्रंथाचा भारताची नैसर्गिक संपत्ति व उत्पादन यावरील पहिला खंड डिसेंबर १९४८ मध्यें प्रसिद्ध झाला होता. या ग्रंथांत 'सी' अक्षरापासून सुरुवात होणारे लेख असून त्यांत इतर गोष्टींबरोबर आर्थिक दृष्ट्या फायदेशीर अशा २३० वनस्पतींच्या जाती व उपजाती, ८ महत्त्वाचे खनिज पदार्थ व ७ प्राणिजन्य वस्तु यांचा परामर्ष घेतला आहे. चहा व कॉफी यांसारखीं पेयें आणि ताग, अंबाडी व रेशीम यांसारखे तंतुमय पदार्थ, तसेंच कापूस आणि वेरणीचे प्रकार इत्यादि विषय हाताळण्यांत आले आहेत. त्याचप्रमाणें भारळ, पपई, लिंबू, खरबूज यांसारखीं समशीतोष्ण हवामानांत सर्वत्र होणारीं फळें व भाजीपाला यांसहि या ग्रंथांत स्थान देण्यांत आलें आहे. हाताळण्यांत आलेल्या इतर विषयांची वर्गवारी गोंद व राळ, औषधी वनस्पति, मळितांचीं भाड्यें, अत्तरें व आवश्यक तेलें, कडधान्यें, कंदपिकें, मसाले, कमावलेलीं कातडीं, भाजीपाले, लाकूड, इमारती लाकूड या उपगटांत आणि कोळसा, चिनी माती व अशुद्ध तांबें यांची खनिज पदार्थ या उपगटांत करतां येईल. तसेंच उंट, मगर आणि रंगकृमि यांवरहीं संपूर्ण टिपणें दिलीं आहेत.


**सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक, लि:**



(स्थापना १९१८)

हेड ऑफिस—
गिरगांव, मुंबई.

शाखा: दादर, माहीम, मार्केट—भेंडगांव


## सावकारी नियंत्रण कायद्याचे तोटे

### चौकशीची व सुधारणांची आवश्यकता

(लेखक:—श्री. ज. वि. दातार, कॉन्ट्रॅक्टर, पुणें)

आम्हां व्यापारी-धंदेवाल्यांस सावकारी कायदा अमलांत येण्यापूर्वी सावकार लोक हातावर, प्रॉ. नोट लिहून घेऊन भांडवल देत असत व ज्यास जो व्याजाचा दर परवडेल तो राजीखुषीनें देत असे व केवळ त्या पैशाच्या मदतीमुळेंच त्याला त्याचें कौशल्य वापरून आपली मिळकत मिळवतां येत असे. म्हणूनच त्याला व्याजाच्या दराची पर्वा वाटत नसे. अशा रीतीनें खेळत्या भांडवलाची सोय होई व स्वतःचे जबाबदारीवरच तें मिळत असे. उदाहरणार्थ, शहरांतील लहान धंदेवाला मारवाडी म्हणा अगर दुसरा कोणी याजकडून हजार-पांचशें रुपये भांडवल व तें २ रु. दरमहा दर शेंकडा दरानें घेऊन त्यावर मेहनत करून दररोज ४ते५ रु. कमाई करूं शकत होता व सावकारास खुशीनें १० रु. महिना व्याज देई. अशाच रीतीनें ज्यांना लहान मोठ्या रकमांची जरुरी पडेत असे ते सर्व याच मार्गानें भांडवल उभे करत असत व माझ्या माहितीप्रमाणें व्याजाच्या जबर दराबद्दल कोणत्याही शहरी धंदेवाल्यानें तक्रार केल्याचें आठवत नाहीं.

मध्यंतरीच्या काळांत सहकारी बँका एक अगर दोन जामीन घेऊन भांडवल पुरवीत. परंतु या व्यवहाराबाबतत जामिनकी भरलेल्या लोकांची यादी उत्तर देईल. कांहींनीं कमी दराच्या भांडवलामुळें फायदा करून घेतला. परंतु या सहकारी बँकांत ज्याचा वशीला असे, त्याचाच फायदा होऊं शकला; सर्व साधारण नियम म्हणून फायदा झाला असें म्हणतां येत नाहीं. ह्या बँकांच्या कर्जाची रक्कम अत्यंत मर्यादित असे व तीहि तात्काळ मिळत नसे, हा प्रश्न वेगळाच आहे.

त्यापुढें सावकारी कायदा झाल्यावर बऱ्याच सावकारांनीं परवाना न घेतल्यानें धंदेवाल्यांचे अत्यंत हाल झाले व होत आहेत. कांहीं बँकाकडून तारणावर व जामिनकीवर लहान-मोठ्या रकमा मिळून कांहीं सोय होऊं लागली तोंच रिझर्व्ह बँकेच्या कडक धोरणामुळें लहान बँका आतां पूर्वीप्रमाणें कर्ज देईनाशा झाल्या आहेत व जागतिक मंदी, नाण्याची टंचाई, प्राप्ती कराची जबर आकारणी, भावाची अनिश्चितता, या सर्वांमुळें ज्यांचे जवळ स्वतःच्या भांडवलाचा पुंजा भरपूर नाहीं त्यांना व्यापार करणें दुरापास्त होऊं लागलें आहे. तात्पर्य, सावकारी कायदा जर शेतकरी लोकांस भांडवल देण्यापुरताच जारी केला असता तर धंदेवाल्यांस भांडवलाची सोय पूर्वापार सावकारी धंदा करणाऱ्यांनीं केली असती. आज ज्या व्यापाऱ्यांजवळ भांडवलाची सुबत्ता आहे ते सर्व व्यवहारांत मोनोपली करून इतरांस धंद्यास जागाच देत नाहींत व त्या योगें मालाचे दर या लोकांच्या मर्जीप्रमाणें कमी जास्त ठरविले जातात. तेव्हां या सावकारी कायद्याच्या पूर्वीच्या व आताच्या तुलनात्मक स्थितीची चौकशी होऊन योग्य ती सुधारणा करावी, म्हणजेच वैयक्तिक स्पर्धा वाढून व्यापाराचे दर उतरण्याची आशा आहे.

## विद्यार्थ्यांची लिमिटेड कंपनी

आधुनिक अर्थव्यवहारांत मर्यादित जबाबदारीच्या भाग-भांडवलाला महत्त्व प्राप्त झालेलें आहे. तथापि ह्या भाग-भांडवलाच्या जबाबदाऱ्या व कर्तव्यें ह्यासंबंधींची जाणीव भागीदारांना पुष्कळदा नसते. भारतांतील भागदार तर ह्या बाबतींत पुष्कळदा उदासीन असलेले दिसून येतात. मोठ्या माणसांची ही अवस्था असल्यावर शाळकरी मुलांबाबत बोलणेंच नको. इंग्लंडमध्यें एका शाळेनें भाग-भांडवलाची कल्पना शाळेंतील मुलांना देण्यासाठीं एक प्रयोग केला आहे. त्याची हकीकत अशी :—

मार्केट रेझन मॉडर्न स्कूल बी-कीपिंग कंपनी नांवाची एक कंपनी काढण्यांत आली आहे. कंपनीचें भांडवल २० पौंडांचें होतें व तें प्रत्येकीं एक शिलिंगाच्या २०० भागांत वाटण्यांत आलें होतें. शेतीचा व्यवसाय करून होईल तो वार्षिक नफा वांटणें असा कंपनीचा हेतु होता. कंपनी जो मध तयार करीत असे तो नजीकच्या गांवांतील दुकानांना व मुलांच्या आईबापांना विकण्यांत येई. ह्या कंपनीचे संचालक १४ ते १५ वर्षांचीं शाळेंतील मुलेंच होतीं. ह्या वर्षी कंपनीनें १०० टक्के नफा वाटला. गेल्या वर्षी तर १२५ टक्के नफा वाटण्यांत आला होता. कंपनी सुरू केल्याला आतां दहा वर्षें झालीं असून ह्या काळांत ५० टक्के ते २०० टक्के पर्यंत वार्षिक नफा वाटण्यांत आला. कंपनीची मालमत्ता सुमारें १०० पौंडांची आहे. तींत मधाची पोळी, मध व धंद्याला लागणारीं उपकरणें आहेत. भारतांतील शाळांनीं अशा कंपन्या काढून भाग-भांडवल हाताळण्याचें शिक्षण विद्यार्थ्यांना दिल्यास तें त्यांना उपयुक्त होईल.

---

## महाड तालुका सहकारी खरेदी विक्री संघ लिमिटेड.

( वार्षिक सभा: १०-१२-१९५० )

३० जून, १९५० रोजीं पुऱ्या होणाऱ्या संघाच्या दुसऱ्या वर्षाच्या अखेर संघाच्या सभासदांची एकूण संख्या ३२ आहे. त्यांत सहा सोसायट्या सभासद आहेत. एकूण शेअर भांडवल रुपये २७,३६० चें आहे. मागील वर्षाचा तोटा रु. १५७०-१२-० भरून निघून शिवाय अहवालाचे सालअखेर रुपये ४६३-६-०चा निव्वळ नफा संघास झाला आहे. सदर नफ्यापैकीं नियमाप्रमाणें रुपये ११६-६-० रिझर्व फंडांत टाकले असून बाकीचा नफा रुपये ३४७-०-० अहवालाचे पुढील म्हणजे तिसरे वर्ष अखेरच्या नफ्यांत सामील करण्याकरितां ठेवून दिला आहे. ह्या शिवाय म. आसिस्टंट रजिस्ट्रारसाहेब यांचेकडून आलेले रु. ३०० रिझर्व फंडांत टाकले आहेत ते निराळे. अहवालाच सालांत महाड येथें कापडाचें एक स्ट्रॅटेजिक शॉप, महाड रेशन-एरिया करितां चार धान्य दुकानें व महाड रूरल एरियाकरितां एक धान्य दुकान अशीं दुकानें संघानें चालविलीं. ह्या शिवाय, लोखंडी सामान ( नळीचे पत्रे, प्लेन पत्रे, घांवा, आंस, घमेली, पोहरी, टिकाव, गज, काटेरी तारा, वगैरे ), गव्हाचा भुसा, साखर आगपेट्या, सिमेंट, कोळसा, तरटाची चूण, पड, छत्र्या वगैरे जिनसांचा व्यापारहि संघानें केला. अहवालाचे सालांत संघाचा मागचा तोटा भरून निघून शिवाय नफाही झाला आहे. ह्यावरून संघ आर्थिक दृष्ट्या प्रगतिपथावर आहे हें दिसून येईल. प्रारंभिक अवस्थेतून संघ बाहेर पडला आहे व ह्यापुढें संघाची प्रगति झपाट्यानें होऊन संघाचें कार्य दिवसेंदिवस वाढत जाईल अशी आशा करण्यास कांहींच हरकत नाहीं. पुढील वर्षअखेर सभासदांस डिव्हिडंड देतां येईल अशी व्यवस्थापक मंडळास खात्री वाटते.

( चेअरमन : सुंदर मेठा बटाला, बी. ए. एलएल. बी. मॅनेजर : म. मो. चांदे, बी. कॉम ).


**व्यापारी व कारखानदार**

यांचे प्रश्न सोडविण्यास मदत करूं व सल्ला देऊं.

— ३० वर्षांचे अनुभवी. —

कंपनी कायदा व मॅनेजमेंट, रेकॉर्डस्, ऑफिस मॅनेजमेन्ट व ऑर्गनायझेशन कॉस्टिंग्ज्, व्यापारी व ऑफीस चार्ट्स, वगैरे कामें माफक फी घेऊन करून देऊं. लिहा:—


जी. के. ॲण्ड सन्स,
विद्यामंदिर, मुंबई २४.

---

**Dr. WAMAN GOPAL'S SARSAPARILLA**
BEST BLOOD PURIFIER

---

**रोखीनें व हप्त्यानें विकत मिळतात.**



जुनी मशीन देऊन नवी घ्यावयाची असल्यास आम्ही बदली करून देतों.

**पेडणेकर आणि कं. लिमिटेड**


शिवण्याच्या यंत्रांचे व्यापारी, १७२ गिरगांव रोड, मुंबई ४.

तारेचा पत्ता:—PEDNECO, Bombay. फोन नं. २१७३८

---




---



## किर्लोस्कर बंधू लि.

### गेल्या वर्षातील उत्कृष्ट कामगिरी

३१ जुलै १९५० अखेरचा ताळेबंद

| | (रुपये) | | (रुपये) |
|---|---|---|---|
| वसूल भांडवल | १५,४८,१८७ | इमारती | ११,५७,०५२ |
| रिझर्व्ह व इतर फंड | ४१,५७,८९४ | माशिनरी | २३,५७,५६४ |
| घसारा | २७,९३,६२३ | स्टोअर्स व स्पेअर पार्टस | २९,८७,३५० |
| कर्जे | ६,२८,८०६ | स्टॉक इन ट्रेड | १२,१३,२६२ |
| देणीं | १८,४४,१५८ | येणीं | ११,७०,३६० |
| न नेलेलें डिव्हिडंड | १,०६,९११ | शेअर्स | ७,७२,०१५ |
| निव्वळ नफा | ५,६०,५९५ | रोख व बँकांत | १०,४५,३९३ |

३१ जुलै, १९५० अखेर संपलेल्या वर्षा किर्लोस्कर बंधू लि. नें उत्कृष्ट यश दाखवून आपल्या सुस्थितींत भर घातली आहे. सुमारें ४३/४ लक्ष रुपये घसारा काढून कंपनीनें २४,५६,३१५ रु. ठोक नफा मिळविला. म्हैसूर किर्लोस्कर लि., हरिहरकडून मॅनेजिंग एजन्सी कमिशन, शेअर डिव्हिडंड व ऑफीस अलावन्स ह्यांचे ७५,४७२ रु. मिळाले. सर्व खर्च भागवून, ८ लक्ष रुपयांची कराची तरतूद करून, कामगारांचेसाठीं २१/४ लक्ष रु. बोनससाठीं बाजूस काढून निव्वळ नफा ५,६०,५९५ रु. उरला. त्याची वाटणी खालीलप्रमाणें करण्यांत आली:—

| | |
|---|---|
| रिझर्व्ह फंड (आतां हा फंड २३,७९,१६६ रु. होईल.) | रु. २,००,००० |
| कामगारांचे रेस्ट हाऊस बिल्डिंग फंड | ८०,००० |
| डिव्हिडंड ई. फंड | ३५,००० |
| ॲप्रेंटिस ट्रेनिंग स्कीम फंड | ३०,००० |
| डिव्हिडंड ८% + बोनस ६% | २,१४,२८४ |

किर्लोस्कर बंधू लि. नें १९२०–२१ सालापासून आतांपर्यंत दिलेल्या डिव्हिडंडची वाटणी २१८३/४% होते. म्हणजे, वार्षिक सरासरी ८.७४% पडते.

बेळगांव येथें १८८८ मध्यें श्री. लक्ष्मणराव किर्लोस्कर ह्यांनीं पेरलेल्या बीजाचा किर्लोस्कर कारखानदारीचा वृक्ष हिंदी शेतकऱ्यांच्या आर्थिक उन्नतीस व राष्ट्राच्या औद्योगिक प्रगतीस बहुमोल हातभार लावीत आहे. उत्पादकांचें ध्येय चालकांनीं सतत नजरेसमोर ठेवून किर्लोस्कर हें नांव अखिल भारतांत गुणांसाठी श्रेष्ठपदीं पोंचविलें आहे. किर्लोस्करांच्या कारखान्यांच्या यशामागें जी तपश्चर्या आहे, तिचेबद्दल उत्पादकांचें ऋण मानावें तेवढें थोडेंच आहे.

शेतकीचीं अवजारें व यंत्रें आणखी मोठ्या प्रमाणावर उत्पादन करण्यासाठीं कंपनी नवी यंत्रसामग्री उभारीत आहे आणि वीज निर्माण करणारीं यंत्रेंहि उभारून विजेच्या वाढत्या गरजेची तरतूद करीत आहे.

---

### मलबार प्रिन्सेसचा ५५ लाखांचा विमा

एअर-इंडिया इंटर नॅशनलच्या मलबार प्रिन्सेस विमानास आल्प्स पर्वतांत अपघात होऊन तें कोसळलें. त्याचा ५५,००,००० रुपयांचा विमा कंपनीनें उतरलेला होता. कंपनीनें प्रत्येकीं ५५,००,००० रुपये किंमतीचीं दोन नवीं विमानें खरेदी करण्याचें ठरविलें आहे.

### १९५१ मधील पोस्टाच्या सुट्या

पोस्ट खात्याच्या सर्व विभागांत १९५१ मध्यें रविवार खेरीज पुढील दिवस सुटीचे म्हणून पाळण्यांत येतील:—

१ जाने.–बँक हॉलिडे, २६ जाने.–प्रजासत्ताक दिन, ६ मार्च शिवरात्र, २३ मार्च होळी किंवा गुड फ्रायडे, ७ जुलै–इद उल फित्र, १५ ऑगष्ट–स्वातंत्र्यदिन, २४ ऑगष्ट–जन्माष्टमी १३ सप्टेंबर–इद उल झुहा, २ ऑक्टोबर–महात्मा गांधी जयंती, १० ऑक्टोबर–दसरा, १२ आक्टोबर–मोहरम, ३० ऑक्टोबर दिवाळी, १३ नोव्हेंबर–गुरु नानक जयंती, १२ डिसेंबर इद–इ-मिलाद, २५ डिसेंबर–नाताळ. मुंबई विभागांत शिवरात्रीच्या सुट्टीऐवजीं ५ सप्टेंबर, १९५१ रोजीं गणेश चतुर्थीला सुट्टी राहील. मुस्लीम सणाच्या सुट्यांचे दिवस चंद्रदर्शनानुसार बदलण्याचा संभव आहे.

तार कचेऱ्यांच्या सुट्या मागाहून स्वतंत्रपणें जाहीर करण्यांत येतील. पोस्ट आणि तार कचेऱ्या एकत्र असणाऱ्या कचेऱ्यांत तारेचा विभाग तार कचेऱ्यांच्या सुट्यांच्या दिवशींच बंद राहील.

---

### पैशाचा फुगवटा टाळण्यासाठीं बँकांस हुकूम

अमेरिकन बँकांनीं आणखी २०० कोटी डॉलर रक्कम रिझर्व्ह म्हणून बाजूस ठेवावी, असा हुकूम फेडरल रिझर्व्ह बोर्डानें काढला आहे. त्याचा हेतु, बँकांची चलनवाढ करण्याची शक्ति आवाक्यांत राखणें, हा आहे. २०० कोटी डॉलर गोठवले, तर १२०० कोटी डॉलर व्यवहारांत कमी रहातील असा अंदाज आहे.

---

### हॉटेलांतील मेनू इंग्रजींत छापा

ग्रेट ब्रिटनमधील हॉटेलांतून ग्राहकांच्यासाठीं तयार केलेल्या खाद्यपेयांची यादी अद्याप फ्रेंच भाषेंत छापलेली असते. पूर्वी फक्त श्रीमंत इंग्रज फ्रान्समध्यें चैनीसाठीं जाऊं शकत आणि परत आल्यावर ते आपली ऐट दाखविण्यासाठीं फ्रेंच भाषेंत आपणांस काय हवें तें सांगत. ह्या भिजाशीचें शेंपूट अजूनहि कायम आहे. शेकडा ९९ ग्राहकांना फ्रेंच समजत नाहीं. मेनू कार्ड इंग्रजींतच छापण्यांत यावें, असा आग्रह करणारा एक ठराव मँचेस्टर येथील हॉटेलांतील कामगारांच्या परिषदेंत मांडण्यांत येणार आहे.

---

### देशी सौंदर्य प्रसाधनें वापरा

विदेशी सौंदर्य प्रसाधनांच्या ऐवजीं देशी प्रसाधनें वापरून हिंदी स्त्रियांनीं परदेशी हुंडणावळीची बचत करावी, असें श्री. श्रीप्रकाश ह्यांनीं नुकतेंच सांगितलें. विड्याचीं पानें, तीळ, मेंदी व चमेली ह्यांचें सुगंधी तेल, इ. ची शिफारस त्यांनीं केली.

---

### अमेरिकन सैनिकास ४५ हजार रु. चा मोफत विमा

प्रत्येक अमेरिकन सैनिकाला त्याच्या सरकारकडून १०,००० डॉलर्सचा विमा मोफत मिळणार आहे. २७ जून १९५० पासून त्याप्रमाणें विम्याचा फायदा दिला जाईल. म्हणजे, कोरियन युद्धांत आजवर मरण पावलेल्यांच्या कुटुंबियांनाहि विम्याची रक्कम मिळेल. ह्या संबंधांतील बिल अमेरिकन हाऊस ऑफ रिप्रेझेंटेटिव्हजमध्यें नुकतेंच मंजूर झालें.

---

### बॉम्बे स्वदेशी को. स्टोअर्स लि.

वरील को. स्टोर्से कं. ला ३० जून १९५० अखेर संपलेल्या वर्षी १,०४,०२८ रु. नफा झाला. गेल्या वर्षी १,२४,४०९ रु. नफा झाला होता.

## संसदेंत आर्थिक प्रश्नांवर प्रकाश

### साखर आणि गूळ

ऊंस, गूळ आणि साखर ह्यांचे भाव सरकारनें वाढवून दिले आहेत. १० लक्ष टन साखर सरकार कारखान्यांकडून विकत घेणार आणि ही साखर रेशन दुकानांतून हप्तीप्रमाणें विकली जाणार. त्याहून अधिक तयार झालेली साखर कारखानदारांनीं कोठेंही, कोणत्याही दरानें विकावी. गूळ तयार करण्यावर सरकारी नियंत्रण नाहीं. मात्र कमाल भाव ठरवून दिले आहेत—किंमत नियंत्रण आहे.

× × × ×

### उद्योग–पुरवठा खात्यांतील काटकसर.

| | जागा कमी केल्या | आणखी अपेक्षित कपात |
|---|---|---|
| वरिष्ट अधिकारी. | १०९ | ७४ |
| अधिकारी. | १,९०० | १,०३८ |
| वर्ग नं. ४ | १,८४९ | १,११७ |

× × × ×

मिठाचे नवीन कारखाने काढण्याबाबत सौराष्ट्र सरकारशीं दिल्ली सरकारचा पत्रव्यवहार चालू आहे.

× × × ×

भारतांतील वार्षिक सायकल-उत्पादन : १,२५,००० नग

अपेक्षित गरज : ३,७५,००० नग. पुढील सहा महिन्यांतील परदेशी सायकलींची अपेक्षित आयात: १,००,००० नग.

× × × ×

अल्वाये-त्रावणकोर येथील सरकारी मोनोसाईट कारखान्याचें अपेक्षित वार्षिक उत्पादन:

| | |
|---|---|
| थोरिअम नायट्रेट | २०७ टन |
| क्लोराइडस् | १५०० टन |
| ट्रायसोडिअम फॉस्फेटस् | १,८०० टन |

यांचा उपयोग हिंदी कारखान्यांत केला जाईल.

× × × ×

### कारखान्यांतील सरकारी भांडवल

स्वातंत्र्याच्या पहिल्या तीन वर्षांत सरकारनें रु. २७ कोटी, ४५ लक्ष भांडवल कारखान्यांत गुंतविलें आहे—

| | |
|---|---|
| सिंधरीचा खताचा कारखाना | रु. १६·५० कोटी |
| चित्तरंजन रेल्वे इंजिन कारखाना | रु. ७·७७ कोटी |
| दिल्लीचा तयार घरांचा कारखाना | रु. ०·५३ कोटी |
| बंगलोरचा टेलिफोन कारखाना | रु. ०·९२ कोटी |
| अलवायेचा मोनोसाइट कारखाना | रु. ०·३६ कोटी |
| बंगलोरचा विमान कारखाना | रु. १·०० कोटी |
| इंडिअन मायनिंग आणि कन्स्ट्रक्शन कंपनी | रु. ०·२३ कोटी |

### बोटी बांधण्याचा कारखाना

देशाचें संरक्षण आणि व्यापार या दृष्टीनें या धंद्याचें विशेष महत्त्व आहे. युद्धकाळांत विशाखापट्टम् येथें सिंदिया कंपनीनें हा कारखाना सुरू केला. तेथें एका वेळीं तीन बोटी बांधण्याची सोय आहे. परंतु आठ बोटी बांधण्याची सोय झाल्यासेरीज आणि ८-१० कोट रुपये भांडवल यांत गुंतविल्यासेरिज हा कारखाना चालणें कठीण आहे असें दिसलें, तेव्हां हा राष्ट्रीय महत्त्वाचा कारखाना सरकारनें खरेदी करून चालवावा अशी सिंदिया कंपनीनें सरकारला विनंति केली. भांडवलाच्या अडचणीमुळें सरकारनें कारखाना विकत घेण्याचें मान्य केलें नाहीं.

अशा स्थितींत कारखाना बंद करणें किंवा सरकारनें कांहीं मदत देऊन काम चालू ठेवणें हे दोन मार्ग राहिले. सरकारनें आर्थिक मदत देऊन तो कारखाना चालू ठेवला आहे. त्याचें राष्ट्रीय महत्त्व लक्षांत घेऊन आर्थिक अडचणींचें सरकारनें बुजमावणें न दाखवितां हा कारखाना आपल्या ताब्यांत घेऊन त्यांत इष्ट त्या गोष्टींची भर घालून तो सुस्थितींत लवकर आणावा अशी संसदेच्या सभासदांच्या समितीची शिफारस आहे.

× × × ×

### कृत्रिम खतांचा कारखाना

याच समितीनें सरकारच्या सिंधरी येथील खतांच्या कारखान्याच्या कारभाराची पहाणी करून संसदेंत अहवाल सादर केला. त्यावरून राष्ट्रीयीकरणांतील प्रश्नांची कल्पना येण्यास मदत होते.

सिंधरी येथील कारखान्याला येणाऱ्या खर्चाची तपशीलवार माहिती कधीं कोणीही तयार केलेली नाहीं. १९४४ मध्यें अंदाजी खर्च रु. १०·७९ कोटी येईल असें होतें. तो आंकडा १५, नंतर १८ आणि आतां २३ कोटी रु. वर गेला असून हा अंदाजहि अजून पक्का नाहीं !

१९४४ मध्यें कारखान्याची आंखणी केली खरी, पण फेब्रुवारी १९४६ आणि जून १९४७ पर्यंत कामाचीं कंत्राटें दिलीं नव्हतीं. मे १९४७ पर्यंत कारखान्याला लागणारी जमीनही मिळविली नव्हती. या चालढकलीचा परिणाम असा झाला कीं जमिनीची किंमत ४०० टक्क्यांनीं वाढली. यंत्रसामुग्रीच्या किंमतींत ८० टक्के वाढ; लोखंड पोलादाच्या किंमतींत ४० टक्के वाढ; आणि त्यापासून तयार करावयाच्या सामानाच्या किंमतींत १०० टक्के वाढ झाली. केवळ दिरंगाईचा हा भुर्दंड ! त्याशिवाय इंजिनिअर्स–काँट्रॅक्टर्स यांना द्यावी लागलेली ज्यास्तीची फी, कामिशनें व कारकून–अधिकाऱ्यांचे चालू पगार–भत्ते ते निराळेच !!

केवळ खर्चाचा अंदाज नाहीं एवढेंच नव्हे तर त्यांत एकसूत्रीपणाही नाहीं. बारा अधिकाऱ्यांनीं स्वतंत्र खर्च करावयाचे आणि आठ हिशेब–अधिकाऱ्यांनीं त्यांचे हिशेब ठेवावयाचे !

सरकारनें किंवा संसदेनें या कारखान्याचा अंदाजी खर्च कधींच मंजूर केलेला नाहीं. "येथील कामावर कोणाचेंच नियंत्रण नाहीं अशी लोकविलक्षण स्थिति आहे."

सरकारनें एक समिति तावडतोब नेमून या प्रकरणांत लक्ष घालावें असें सुचवून, अहवालांत पुढें बंगलोरच्या मशीन टूल्स कारखान्याचा उल्लेख आला असून त्याबाबत तरी या चुका सुधाराव्यात, असें म्हटलें आहे.

— संजय

भिकाऱ्याचें बँकेंत खातें—अंकारा येथील एक भिकारी मैरंटी बँकेंतील आपल्या चालू खात्यावर १३२ पौंड भरीत असतांना पोलिसांनीं त्याला अटक केली. ह्या भिकाऱ्याच्या खात्यावर ३,४५२ पौंड होते. ह्या बँकेशिवाय इतर बँकांतहि त्याचीं खातीं होतीं आणि तयार कपडे करणाऱ्या एका दुकानांत त्याची भागीदारीही होती. हा सर्व पैसा त्यानें 'काम' करून, म्हणजे भीक मागून मिळविला होता !

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गानिवास', ८२३ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.